महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६

Email:ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

---

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने जाहिरात क्र.१/२०२४, दि.२५.०७.२०२४ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. या जाहिरातीशी संलग्न असलेल्या "उमेदवारांसाठीच्या सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र.८ वर पुढीलप्रमाणे नमूद आहेः-

*"उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गासाठी ऑनलाईन परीक्षा एकुण १२० गुणांची (प्रत्येकी २ गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे ६० प्रश्न) घेतली जाईल. त्यापैकी मराठी + इंग्रजी + सामान्यज्ञान + बौद्धिक चाचणी यासाठी प्रत्येक विषयास ३० गुण याप्रमाणे १२० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. सदर ऑनलाईन परीक्षा ही उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक या पदासाठी निश्चित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेशी संबंधित अभ्यासक्रमावर आधारित व ९० मिनिटांची असेल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. समान गुण मिळालेल्या उमेदवारांबाबत शासनाने निर्गत केलेल्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल. तथापि, जे उमेदवार परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल. व्यावसायिक चाचणी वेळापत्रकाबाबत अशा पात्र उमेदवारांना स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल. तसेच, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०४.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन परीक्षा व व्यावसायिक चाचणी यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे शिफारस / निवडसूची तयार करुन शिफारस / निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल".*

त्यानुसार उक्त नमूद संवर्गातील पदभरती संदर्भाने ऑनलाईन परीक्षा दि.२६.११.२०२४ रोजी पार पडली आहे. त्यास अनुसरुन आता प्रस्तुत प्रसिध्दीपत्रकाद्वारे पुढीलप्रमाणेची कार्यवाही करणेबाबतची सूचना प्रसिध्द करणेत येत आहे.

**(अ) उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीबाबत :-**

सदरहू ऑनलाईन परीक्षेमध्ये ज्या उमेदवारास ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त आहेत; अशा व्यावसायिक चाचणी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीतील पात्र उमेदवारास उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदासाठीची टंकलेखनासह लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी परीक्षा देणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सूचित करण्यात येते की,

१) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने मराठी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनीट आणि मराठी टंकलेखनचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास मराठी टंकलेखनासह मराठी लघुलेखन हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.

२) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास इंग्रजी टंकलेखनासह इंग्रजी लघुलेखन हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.

CamScanner

३) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने मराठी लघुलेखनाचा व इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनीट तसेच मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास मराठी टंकलेखनासह मराठी लघुलेखन किंवा इंग्रजी टंकलेखनासह इंग्रजी लघुलेखन या दोन पर्यायांपैकी केवळ एकच पर्याय निवडणे आवश्यक आहे.

**(ब) निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीबाबत :-**

सदरहू ऑनलाईन परीक्षेमध्ये ज्या उमेदवारास ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त आहेत; अशा व्यावसायिक चाचणी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीतील पात्र उमेदवारास निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदासाठीची टंकलेखनासह लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी परीक्षा देणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सूचित करण्यात येते की,

१) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने मराठी लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनीट आणि मराठी टंकलेखनचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास मराठी टंकलेखनासह मराठी लघुलेखन हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.

२) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास इंग्रजी टंकलेखनासह इंग्रजी लघुलेखन हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.

३) व्यावसायिक चाचणी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्या उमेदवाराने मराठी लघुलेखनाचा व इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनीट तसेच मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले आहे व त्याबाबतची प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जासोबत यापूर्वीच अपलोड केली आहेत, अशा उमेदवारास मराठी टंकलेखनासह मराठी लघुलेखन किंवा इंग्रजी टंकलेखनासह इंग्रजी लघुलेखन या दोन पर्यायांपैकी केवळ एकच पर्याय निवडणे आवश्यक आहे.

उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक या संवर्गातील पदभरती संदर्भाने नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंक द्वारे दि.२६/०२/२०२५ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत पर्याय निवडण्याची उमेदवारास संधी देण्यात येत आहे. उमेदवाराने एकदा निवडलेला पर्याय अंतिम असेल, त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.

दि.२६/०२/२०२५ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत उमेदवाराने मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखन किंवा इंग्रजी लघुलेखन व इंग्रजी टंकलेखन या दोन्ही पर्यायांपैकी एक पर्याय निवडला नाही तर अशा उमेदवाराने केवळ मराठी लघुलेखनाची व मराठी टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी परीक्षा देणेचा पर्याय निवडला आहे, असे समजून त्याप्रमाणे व्यावसायिक चाचणी परीक्षेचे नियोजन करण्यात येईल व त्या परिस्थितीत सदरहू निवड स्वीकारणे त्या उमेदवारावर बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(विजयकुमार ल. वाघमोडे)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

(अविनाश मा. पाटील)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.